Maharashtra Times, Pune, January 21, 2015 Pp.5



# विज्ञानकथांच्या दर्जासाठी निकष गरजेचे

**डॉ. जयंत नारळीकर यांची स्पष्टोक्ती**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

मराठी साहित्यामध्ये विज्ञानकथांचा दर्जा निश्चित करणारे, त्यांचा चांगले-वाईटपणा ठरविणारे निकष पुढे येणे गरजेचे असल्याचे मत ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ आणि विज्ञानलेखक डॉ. जयंत नारळीकर यांनी मंगळवारी व्यक्त केले. अशा निकषांमधून समोर येणाऱ्या चांगल्या विज्ञानकथा सर्वसामान्य नागरिक आणि वाचकांची विज्ञानाशी जवळीक वाढविण्यासाठी निश्चितच फायदेशीर ठरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

घुमान येथे होणाऱ्या ८८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने डॉ. नारळीकर यांच्या 'माझे विज्ञानकथा विश्व' या विषयावरील व्याख्यानाचे मंगळवारी मॉडर्न कॉलेजच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी डॉ. नारळीकर यांनी आपले मत मांडले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संमेलनाचे स्वागताध्यक्ष भारत देसडला, साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष डॉ. माधवी वैद्य, 'सरहद'चे संजय नहार या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. नारळीकर यांनी आपल्या विज्ञानकथा लेखनाचा प्रवास या वेळी उपस्थितांसमोर मांडला. त्याचप्रमाणे आपल्या अनुभवाच्या आधारे या साहित्यप्रकाराच्या योग्यायोग्यतेविषयीची मतेही मांडली. 'भविष्यात वास्तवात येऊ शकेल अशी कल्पना समाजासमोर मांडणारी विज्ञानकथा ही चांगली विज्ञानकथा ठरते. अशाच चांगल्या विज्ञानकथांमधून जगासमोर आलेले भविष्यवेधी विज्ञान समाजासाठी निश्चितच उपयुक्त ठरते. त्याचवेळी भयकथा, परीकथा किंवा प्रस्थापित विज्ञानातील सिद्ध कल्पनांना धक्का देण्याचा प्रयत्न करणाऱ्या विज्ञानकथा या समाजावर वाईट परिणाम करणाऱ्या ठरतात.' त्यामुळेच विज्ञानकथांचा दर्जा निश्चित करण्यासाठीही निकष तयार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विज्ञानात मागे पडल्यानेच ब्रिटिशांना भारतावर राज्य करता आले. अजूनही आपली पावले अज्ञानाच्याच दिशेने पडत आहेत. आपण सगळ्या गोष्टी असेम्बलिंग करायच्या मागे असल्याने, स्वनिर्मितीकडे लक्षच देत नसल्याची टीका पुरंदरे यांनी केली. ही परिस्थिती बदलण्याची गरजही त्यांनी स्पष्ट केली.

देसडला यांनी प्रास्ताविक केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. नहार यांनी आभार मानले.

स्वप्नील शिंदे




ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर (डावीकडील) यांचे व्याख्यान मंगळवारी पुण्यात आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी उपस्थित शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यासमोर त्यांनी असा आदरभाव व्यक्त केला. वास्तविक, नारळीकरसरांना अखिल विश्वात लौकिक. पण, आपल्याला समाजात कितीही मान दिला जात असला, तरी ज्येष्ठांशी आदराने वागण्याची विनयशील वृत्तीचा दाखला नारळीकरसरांनी दिला.